सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर | मंगळवार, १६ जून २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com | ९

# शाळा प्रवेशोत्सव : बग्गी, कार, बैलगाडीतून आले विद्यार्थी

**महापालिकेच्या ६३ शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव थाटात**

**गुलाब पुष्प देऊन, औक्षण करुन करण्यात आले स्वागत**

**विद्यार्थ्यांचे शाळेतील पहिल्या पावलांचे घेण्यात आले ठसे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या ६३ विविध माध्यमांच्या शाळांमध्ये सोमवार, दि.१५ जून २०२६ रोजी शाळा प्रवेशोत्साव थाटामाटात, दिमाखदारपणे साजरा झाला. काही शाळांमध्ये बग्गी, कार, बैलगाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. गुलाब पुष्प देऊन, औक्षण करुन आणि नवागत विद्यार्थ्यांचे शाळेतील पहिल्या पावलांचे ठसे घेऊन हर्षभराने स्वागत करण्यात आले. गणवेश, पाठ्यपुस्तके, दप्तरही देण्यात आले. काही शाळांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्टीनंतर विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरु झाल्याचे पहावयास मिळाले.

महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी मनपा मराठी मुले शाळा क्र. २८ येथे भेट देऊन विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, मुख्य लेखाधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर, उपायुक्त आशिष लोकरे, सोनाली यादव, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीष पंडित, मनीषा मगर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका अश्विनी चव्हाण, वनिता पाटील, पर्यवेक्षक मनीष बांगर, सुरेश कासार, संतोष बुलबुले, रजनी राऊळ, निलोपर शेख आदींनी विविध शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

विनायक नगर येथील डीएसके मनपा शाळा येथे नवागतांचे शामियानात आतिषबाजी करुन रेड कार्पेटवर स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना कारमधून आणण्यात आले. डोक्यावर पुष्पवृष्टी, गोडधोड जिलेबी, हातात पुस्तक अन् नवा कोरा गणवेश घेत मनपा पांढरेवस्ती शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये थाटात प्रवेश केला. धुरंधर चित्रपटातील लोकप्रिय नृत्य शैलीमध्ये विद्यार्थ्यांचे करण्यात आलेले स्वागत हे या शाळेच्या प्रवेशोत्सवाचे वैशिष्ट्य ठरले. नगरसेवक समाधान आवळे, उद्योगपती ठेंगील, माजी मुख्याध्यापक सिध्दण्णा बिराजदार, प्रभा चव्हाण, मुख्याध्यापक अमोल भोसले, किरण शेळगे, श्रीदेवी गौडगावे, अफरीन शेख यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मनपा मुलांची मराठी केंद्र शाळा कॅम्प शाळेत ढोल ताशांचा गजर आणि लेझीमच्या ठेक्याने नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेवक नरसिंह आसादे, पर्यवेक्षक सुरेश कासार, मुख्याध्यापक सुरेश सरगम, अप्पासाहेब ककमारे, रंजना गायकवाड, धोंडू केंगले, जयकुमार वसावे, अश्विनी जवळगे, संध्या जाधव, प्राणेश त्रिमल, रामेश्वरी बेरुणगी, अर्चना गोचडे, प्रियांका वाघमारे आदी उपस्थित होते. देशमुख वस्ती येथील शाळेत बबन ऐवळे, चंद्रकांत देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक राहुल पाटील, संतोष सुतार, नागेश गोसावी, उमेश युवनाती आदी उपस्थित होते.

मनपा मुलांची मराठी केंद्रशाळा क्र. ४ च्या वतीने विद्यार्थ्यांची बग्गीतून मिरवणूक काढत स्वागत करण्यात आले. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, नगरसेविका अश्विनी चव्हाण, वनिता पाटील, संतोष पाटील, रजनी राऊळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे औक्षण करुन, गुलाब पुष्प देऊन, पहिल्या पावलांचे ठसे घेऊन स्वागत करण्यात आले. तसेच ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या मुलांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उमा चंदनशिवे, संतोष जाधवर यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.














### शिक्षण हा समाज परिवर्तनाचा प्रभावी मार्ग

शिक्षण हा समाज परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. प्रत्येक बालक शाळेत दाखल होऊन नियमित शिक्षण घेणे; ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. पालकांनी मनपा शाळांवर विश्वास ठेवून आपल्या पाल्यांना नियमित शिक्षणासाठी प्रोत्साहित करावे, असे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी सांगितले.






### शाळा बालकांचे भावविश्व घडविते : प्रशासनाधिकारी माने

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. शाळा बालकांचे भावविश्व घडविते, सामाजिक विकासात व राष्ट्राच्या जडणघडणीत शाळेचे अद्वितीय स्थान आहे. शाळांतून दिले जाणारे शिक्षण हे जीवनदायी आहे. दर्जेदार शिक्षणासाठी आपण कटिबध्द आहोत. महापालिकेच्या सर्व शाळांमधून हा प्रवेशोत्सव आता पार पडला आहे, असे महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी सांगितले.

### ३ लाख ७७ हजार १३० पाठ्यपुस्तकांचे शाळांना वितरण

सन २०२६-२७ समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजना अंतर्गत सन २०२६-२७ पाठ्यपुस्तक पुरवठा व वितरणाची स्थिती अशी, मागणी केलेल्या पाठ्यपुस्तकांची संख्या : ४ लाख २४ हजार २४४, प्राप्त झालेल्या पाठ्यपुस्तकांची संख्या : ३ लाख ७७ हजार १३०, शाळांना वितरित केलेल्या पाठ्यपुस्तकांची संख्या : ३ लाख ७७ हजार १३०, अप्राप्त पाठ्यपुस्तकांची संख्या : ४७ हजार ११४, प्राप्तीची टक्केवारी : ८८.८९ टक्के.

### एकूण ६३ शाळा; ५ हजार २२० विद्यार्थी

सोलापूर महापालिकेच्या एकूण ६३ शाळा आहेत. यामध्ये प्राथमिक ५७ तर माध्यमिक ६ शाळा आहेत. महापालिकेच्या शाळांमध्ये एकूण ५ हजार २२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर प्राथमिकचे २२० तर माध्यमिक शाळांमध्ये १७ शिक्षक आहेत, अशी माहिती महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी दिली. सुमारे ५ हजार २२० विद्यार्थी पहिल्या दिवशी उपस्थित होते. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

## शिक्षणाच्या नव्या पर्वाला उत्साहात सुरुवात

**शिक्षणाच्या नव्या पर्वाला उत्साहात सुरुवात**

**सीईओ जैन यांनी दिला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

मोहोळ तालुक्यातील पापरी येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील नवागत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शिक्षणाच्या नव्या पर्वाला उत्साहात सुरुवात करण्यात आले. जिल्हा परिषदेचे सीईओ कुशल जैन यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश दिला.



विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. सजावट, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि पालकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे शाळा परिसर उत्सवमय झाला होता. येथील शैक्षणिक व भौतिक सुविधांची पाहणी करुन पालकांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या दिशेने हा उपक्रम प्रेरणादायी ठरत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## महात्मा विद्या मंदिर, सोमनाग प्रशालेत वार्षिक प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील सुनील नगर येथील बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महात्मा विद्या मंदिर व सोमनाग प्रशाला येथे वार्षिक प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न झाला. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थिनीने घोड्यावर स्वार होऊन प्रभावी सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

सुनील नगर, कलावती नगर आदी परिसरातून बँन्ड पथकाच्या निनादात फेरी काढण्यात आली. नगरसेवकद्वय सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, सिध्देश्वर कमटम, संस्थाध्यक्ष शंकर चौगुले, संस्थेच्या सचिवा शारदा चौगुले, संचालक सौरभ चौगुले, साक्षी चौगुले, अमर चौगले, लावण्या चौगुले, नागराज चौगुले, मुख्याध्यापक शहाजी नीळ यांच्या हस्ते पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली.



## शाळेची घंटा : नव्या प्रवासाची नांदी

**शिक्षणाधिकारी यांनी वाजवली शाळेची घंटा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मजरेवाडी येथे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी शाळेची घंटा वाजवून शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ केला. शाळेची घंटा ही केवळ वर्ग सुरु होण्याची सूचना नसून ती ज्ञान, संस्कार आणि यशस्वी भविष्यासाठीच्या नव्या प्रवासाची नांदी आहे, असा संदेश देण्यात आला.



विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, शिक्षकांचा उत्साह आणि पालकांचा विश्वास यामुळे शाळेचा परिसर चैतन्यमय झाला होता. शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याचे भविष्य उज्ज्वल घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. आजच्या प्रवेशोत्सवद्वारे नव्या आशा, नवे संकल्प आणि ज्ञानाच्या उज्ज्वल प्रवासाची सुरुवात झाल्याचे सांगण्यात आले.



## कुचन प्रशालेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशालेत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करत प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षण संस्थेचे विश्वस्त विजयकुमार गुल्लापल्ली यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

शाळेच्या परिसरात फुग्यांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाळेचा पहिला दिवस या विषयावर एक नाटिका सादर करण्यात आली. प्रशालेच्या सहशिक्षका अनुप्रिता हजारे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे, रुपाली क्षीरसागर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

## श्री शंकरलिंग बणगार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

गुरुवार पेठेतील श्री शंकरलिंग बणगार समाज ट्रस्ट व श्री शंकरलिंग बणगार युवक संघटनेच्या वतीने बणगार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रात यश संपादन केलेले आणि उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. याप्रसंगी बसवराज मोहन संभण, चंद्रशेखर दसमाने, चन्नप्पा शहापुरे, संगमनाथ बागलकोटी, नगरसेवक प्रवीण दर्गोपाटील, सोमशेखर गोकावी, विनय बागलकोटी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सत्कारमुर्तीमध्ये सोहम सरस्वती वीरेंद्र धनशेट्टी, श्रेया रुपाली इरप्पा यागंटे, प्रथमेश प्रिती धानप्पा बिळीअंगडी, नचिकेत अपर्णा उमेश बाबानगरे, पंकज अनिता संतोष बागलकोटे, सृष्टी नागम्मा अणविरप्पा उमदी या विद्यार्थ्यांसह डॉ.यश मंजुनाथ तेलसंग, डॉ.आदित्य चंद्रशेखर निंबाळकर, ॲड.शिवम रेशीमकर, पूर्वा प्रकाश किणगी, राचण्णा जेऊरे, रेणुका प्रभाकर रेशीमकर आदींचा समावेश होता. रोहित बिद्री यांनी सूत्रसंचालन केले. संजय धनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. विशाल मणुरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंकर पावरगी, मल्लिनाथ घुळी, उमेश धनशेट्टी, अनिल कुर्ले, धनराज शाबादी, धानेश विजापूरे, आनंद किणगी, गुरुशांत करकमकर, ओंकार थळंगे, आकाश शाबादी, राहुल संभण, उमेश बाबानगरे, अक्षय धोडकुंडे, वीरेश दशमाने, अजय शहापुरे, जगदीश गिडवीर, रामेश्वर लोणी, शंकर शाबादे, राजकुमार धनशेट्टी, रोहित इटगी आदींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी समाजबांधव उपस्थित होते.

## कुरुहिनशेट्टी शिक्षण संकुलामध्ये थाटात प्रवेशोत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

येथील कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्था संचलित श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशाला व श्रीमती सरस्वती तिमप्पा मराठी प्राथमिक शाळेत शाळा प्रवेशोत्सव थाटात संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष प्रा.नारायण संगा यांच्या अध्यक्षतेखाली नवागतांचे औक्षण, इ.१० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. इ.१ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी प्रा.संजय बुगडे, प्रभाकर गोरंटी,गीता साई यांच्यासह राजू काकी, श्रीनिवास गडगी, व्यंकटेश बुट्टा, गिरीष कामुर्ती, व्यंकटेश बुगडे, ईरेश काकी, प्रकाश बुट्टा, निशा केंचगुंडी, अंबिका मादगुंडी, नागमणी गडगी, सोनाली बुगडे, एम.डी.बिराजदार, विजयकुमार बड्डूरे, तट्टे, शेख, आळगी, रायनी उपस्थित होते.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४७३

**चित्तीं चाड नाही। न धरू आणिकाची काही।।**
**सकळ सुख ज्याचे पायीं। मिळे बैसलिया ठायीं।।**

मनुष्य हा देह मुळात नाशवंत आहे. याची जाण माणसाला होत नसल्याने माणूस स्वार्थापोटी याच्या नाशवंतपणाला आणि पराधिनतेला विसरतो. त्याचे हे विसरणे त्याला या देहावर प्रचंड प्रेम करायला भाग पाडते. या प्रेमापोटी तो या देहाला सजवण्याचा व रुबाबदार ठेवण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात माणूस दुसऱ्यावर अन्याय करायला मागेपुढे पाहत नाही. देह म्हणजेच मी, अशी भावना जोपासणारा माणूस दुसऱ्याच्या भावनेची कदर करीत नाही. त्याचबरोबर देहाच्या रक्षणासाठी तसेच देहाच्या आकर्षकतेसाठी तो वाट्टेल ते करतो. मोठेपणासाठी वाट्टेल ते करणारा माणूस लोक आपणाला नांव ठेवतील का ? या प्रश्नाकडेही काही प्रमाणात पाहतो. स्वार्थापोटी लोकांच्या बोलण्याला विशेष महत्व देत नाही. पण ज्याला देह म्हणजे मी हे मान्य नसते तो व्यक्ति देहाच्या रक्षणासाठी, त्याला सजवण्यासाठी अनितीचा मार्ग अवलंबत नाही. त्याचबरोबर सद्सदब विवेक बुध्दिला पटलेले कार्य करतांना लाजतही नाही. सेना महाराजांची अवस्था अशीच होती. म्हणून ते उघडपणे नाचत गात पांडूरंगाचे नांव घेण्यात कोणाची लाज बाळगत नसत. तसेच कोणी कांही म्हणेल का? याची, **चित्तीं चाड नाही। न धरू आणिकाची काही।।** या त्यांच्या शब्दांप्रमाणे पर्वाही करीत नसत. यालाच निस्सिम, निस्वार्थ भक्ति म्हटले तर उचितच होईल.



समचरणी उभा राहून समतेचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाकडे पाहण्याचा कोणाचा दृष्टीकोन स्वार्थी, कोणाचा निस्वार्थी तर कोणाचा तटस्थ असू शकतो. अर्थात, त्याचे नांव घेण्यामागे, त्याची पूजा पाठ करण्यामागे कोणी स्वार्थ जोपासेल तर कोणी निस्वार्थ तर कोणी हे ही नाही आणि ते ही नाही. संसारात अडकलेल्या जीवाच्या बाबतीत पांडूरंगाची सेवा निस्वार्थपणे होणे तसे अवघड आहे. कारण सांसारीक जीव या नाशवंत देहाला कांही प्रमाणात का होईना मी म्हटल्याशिवाय राहत नाही. त्याचे असे मी म्हणणे म्हणजे एक प्रकारे कळत न कळत ईर्षा, द्वेष, मोह, माया, मत्सर, अहंकार, स्वार्थ आदि मानवतेच्या शत्रूंना आमंत्रण देणे होय. पण ज्याला संसारात राहून वेगळे राहता येते, तो नाशवंत देहाला मी म्हणत नाही. असा देह म्हणजे मी नव्हे म्हणणारा सेनाजींसारखा महात्मा नाशवंत व भौतिक सुखाला सुख मानत नाही. त्यांचे सुख हे ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार, मीपणा, स्वार्थ, लोभ आदिला पायदळी तुडवून समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम व कर्तव्याचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाच्या चरणाजवळ, सकळ सुख ज्याचे पायीं ` मिळे बैसलिया ठायीं `, या त्यांच्या शब्दांप्रमाणे होते. अर्थात, पांडुरंग चरणी सुख असल्याचा संतांचा संदेश स्वानुभवातून जनसामांन्यापर्यंत पोहचवण्यात असा महात्मा सुखावला असणार यांत शंका असण्याचे कारण नसावे. सेनाजींचे जीवन कष्टमय होते. तरीही वाटयाला आलेले कर्तव्य पार पाडत त्यांनी समाजाच्या भल्यासाठी ज्ञान प्रसाराचे अत्यंत महत्वाचे कार्य केले. आपणही आपल्या वाटयाला आलेले कार्य योग्य प्रकारे पार पाडून समाजासाठी बरेच काही करु शकतो. आपल्या मानसिकतेवर बरेचसे अवलंबून असते. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# मोहरम उत्सव शांततेत साजरा करा

## कायदा-सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन व सीसीटीव्हीबाबत मंडळांना सूचना

### बार्शी शहर पोलिसांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ जून-**

आगामी मोहरम उत्सव-२०२६ शांततापूर्ण वातावरणात आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखून साजरा व्हावा, या उद्देशाने बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या वतीने शनिवार दि. १३ जून रोजी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत मोहरम उत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना, सुरक्षा व्यवस्था आणि वाहतूक नियोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी ज्या ठिकाणी मोहरम तास जबाबदार सदस्यांची नियुक्ती करावी, आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, सवारी व मिरवणुकीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच सवारी बसविण्यापूर्वी संबंधित प्रशासनाची आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. मोहरम उत्सवाच्या १० दिवसांच्या काळात शहरात कुठेही अनुचित होणार नाही, यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे.

शहरात कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरवल्या गेल्यास किंवा हिंदू-मुस्लिम समाजातील सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या माहितीवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये,असेही त्यांनी स्पष्ट केले. मोहरम उत्सव हा सामाजिक सलोखा आणि धार्मिक श्रद्धेचे प्रतीक असल्याने सर्वांनी शांतता, संयम आणि परस्पर सहकार्याची भूमिका ठेवून उत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. बार्शी शहर पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीस मोहरम उत्सव मंडळांचे पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य तसेच विविध समाजघटकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत उपस्थितांनी विविध सूचना व सूचना मांडत प्रशासनाला सहकार्य करण्याची ग्वाही दिली. प्रशासनानेही उत्सव काळात आवश्यक त्या सर्व सुरक्षा आणि नियोजनात्मक उपाययोजना राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले.

## खांडवीजवळ गाडीवरून पडून जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ जून-**

बार्शी-कुर्डूवाडी मार्गावर झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या बार्शीतील एका ४० वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सुवर्णा सुनील माने (वय ४०, रा. राऊत चाळ, बार्शी) असे मृत महिलेचे नाव असून, या घटनेमुळे बार्शी शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

दि. १० जून रोजी सुवर्णा माने या बार्शी-कुर्डूवाडी रस्त्यावरुन प्रवास करत असताना खांडवी गावाजवळ त्यांचा गाडीवरील ताबा सुटल्याने त्या रस्त्यावर पडल्या. या अपघातात त्यांच्या डोक्यासह शरीराला गंभीर दुखापत झाली होती.

अपघातानंतर त्यांना तातडीने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र, प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने उपचारादरम्यान शनिवार, दि. १३ जून रोजी दुपारी ३ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.

घटनेची माहिती रुग्णालय प्रशासनाने बार्शी तालुका पोलिसांना दिल्यानंतर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याबाबतच बार्शी तालुका ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भालेराव पुढील तपास करीत आहेत.



## ॲड. मिलिंद थोबडे यांचा वीरशैव लिंगायत मंचतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

सोलापुरातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मिलिंद थोबडे यांची महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या सदस्यपदी सलग तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल हिंदू वीरशैव लिंगायत मंचचे प्रांतपालक हेमंतराव हरहरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या निवडणुकीत सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून सर्वाधिक मताने विजयी झालेले ॲड. मिलिंद थोबडे यांनी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या निवडणुकीत सलग तिसऱ्यांदा सदस्यपद (२०२६ मध्ये) जिंकून विजयी हॅट्रिक पूर्ण केली आहे. यापूर्वी त्यांनी २०११ आणि २०२२ मध्ये बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा या संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. दणदणीत विजयानंतर वकिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र 'वकील संरक्षण कायदा' मंजूर करून घेण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

यावेळी हिंदू वीरशैव लिंगायत मंचचे मार्गदर्शक आणि उद्योकपती अण्णाया बिराजदार, अभिषेक ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट पिंपरी चिंचवडचे चेअरमन गुरुराज चरंतिमठ, हिंदू वीरशैव लिंगायत मंचचे मार्गदर्शक प्रा.गजानन धरणे, सोलापूर जनता बँकेचे संचालक श्रीमहादेव न्हावकर, सोलापूर जिल्हा संयोजक चिदानंद मुस्तारे, शहर संयोजक सचिन विभुते, अजित पांढरे उपस्थित होते.

## ट्रॅक्टरला दुचाकीची धडक; एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर

**बार्शी, दि. १५ जून-**

बार्शी शहरातील धस-पिंपळगाव रोडवर शनिवार दि. १३ जून रोजी रात्री झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य एकजण गंभीर जखमी झाला आहे. जिजाऊनगर गेटसमोर रस्त्यावर उभ्या असलेल्या बार्शी नगरपरिषदेच्या कचरा वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला पाठीमागून येणाऱ्या दुचाकीची धडक बसल्याने हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे.

मृत व्यक्तीचे नाव विष्णू महादेव उमाप (वय ४०, रा. भांडगाव, ता. बार्शी) असे असून, अपघातात जखमी झालेल्या दुसऱ्या व्यक्तीवर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. शनिवार दि. १३ जून रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास जिजाऊ नगर परिसरात हा अपघात घडला. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की दुचाकी ट्रॅक्टरच्या मागील भागात घुसून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दरम्यान, अपघातानंतर नगरपरिषदेच्या कचरा वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते संबंधित ट्रॅक्टर रस्त्यावर उभा असताना त्यावर आवश्यक परावर्तक (रिफ्लेक्टर), चेतावणी दिवे अथवा इतर सुरक्षा व्यवस्था नव्हती. त्यामुळे अंधारात दुचाकीस्वाराला वाहनाचा अंदाज न आल्याने अपघात घडल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या घटनेनंतर नागरिकांनी नगरपरिषद प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदारांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. अपघातास कारणीभूत ठरलेल्या बाबींची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. ग्रामीण रुग्णालयातून प्राप्त झालेल्या खबरीवरुन बार्शी शहर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## बेलगाव येथे कडब्याची गंज जळून खाक

### वीज पडून आग लागल्याचा दावा

**बार्शी, दि.१५ जून-**

तालुक्यातील बेलगाव येथील शेतकरी गणेश यादव यांच्या कडब्याच्या गंजीला शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास आग लागून सुमारे साडेतीन हजार कडबा जळून खाक झाला. यात शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. कडब्याच्या गंजीवर वीज पडून ही आग लागल्याचे बोलले जात आहे. सायंकाळच्या सुमारास वादळी वारे सुटले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात विजांचा कडकडाट होत होता. यावेळी गंजीवर वीज पडली व त्यामुळे आग लागली असे सांगितले जात आहे. आग लागल्यानंतर अग्निशमन बंब बोलावण्यात आला होता. अग्निशमन दलाने आग शमवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु तोपर्यंत गंज जळून खाक झाली होती.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. १६ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ शु. द्वितीया
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- आर्द्रा (१६.१२)
योग - वृद्धि (२४.३५)
करण - बालव (१४.४०)
राहू काल : मंगळवार
स. ०३.०० ते ०४.३०

दिनविशेष : १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रसिद्ध मोरारची लढाई झाली.
१९१४: लोकमान्य टिळकांची ६ वर्षांच्या मंडालेच्या तुरुंगवासातून सुटका झाली.
१९५०: हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म.
१९९४: लोकप्रिय मराठी पार्श्वगायिका आर्या आंबेकर हिचा जन्म.

## भक्तिमय वातावरणात २८ दिवसीय ग्रंथदिंडी प्रवचनमालेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

अधिकमासानिमित्त श्री संत सावता महाराज वारकरी मृदंग वादन प्रशिक्षण संस्था आणि हरिपाठ परिवार, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २८ दिवसीय हरिपाठ व प्रवचनमालेचा समारोप भक्तिमय वातावरणात आणि उत्साहपूर्ण ग्रंथदिंडीने करण्यात आला. निराळे वस्ती येथील राजूबाई जांभळे सभागृहात हा धार्मिक सोहळा मोठ्या श्रद्धाभावाने संपन्न झाला.



गेल्या २८ दिवसांपासून सुरू असलेल्या हरिपाठ, कीर्तन, प्रवचन आणि नामस्मरणाच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. याप्रवचनमालेच्या समारोपानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य ग्रंथदिंडीने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

दिंडीदरम्यान गायनाचार्य संजय केसरे महाराज आणि पांडुरंग जांभळे महाराज यांनी सुमधुर अभंग व भजन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या भक्तिपूर्ण गायनाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिकेत जांभळे, अभिराज जांभळे, सचिन भोसले, ऋषिकेश थांबरे, अनिकेत भोसले आणि गुरुनाथ ताटे यांनी परिश्रम घेतले. समारोपानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

महाप्रसाद वितरणासाठी श्री अयोध्या प्रतिष्ठान, निराळे वस्ती, श्री हिंदू रक्षक मित्र मंडळ, निराळे वस्ती, श्रीदत्त गणेश बहुउद्देशीय सामाजिक संस्था तसेच रायगड प्रतिष्ठान यांनी सहकार्य केले. या सर्व संस्थांच्या योगदानामुळे महाप्रसादाचे नियोजन यशस्वीपणे पार पडले. सूत्रसंचालन बळीराम महाराज जांभळे यांनी केले. २८ दिवसीय प्रवचनमालेच्या समारोप सोहळ्याने भाविकांच्या मनावर अविस्मरणीय ठसा उमटविला.

## विश्व हिंदू परिषदेच्यावतीने ॲड. सारंग पाटील यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**मार्डी, दि. १५ जून-**

राज्यातील दिवाणी क्षेत्रात नामांकित ज्येष्ठ विधीज्ञ म्हणून ख्याती असलेले तथा श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई देवी व श्री गुरु नागनाथ महाराज यांचे मानकरी ॲड. इंद्रजित बाळकृष्ण पाटील यांचे ज्येष्ठ सुपुत्र सारंग इंद्रजित पाटील यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी नुकत्याच सोलापूर विद्यापीठाकडून एलएलबीच्या परिक्षा घेण्यात आल्या होत्या. त्यात विशेष प्राविण्य मिळवीत विधीज्ञ म्हणून घवघवीत यश संपादन केल्याच्या प्रित्यार्थ त्यांचा पुष्पगुच्छ देवून विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्ह्याच्यावतीने विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. ॲड.सारंग पाटील यांचे प्राथमिक शिक्षण श्रीक्षेत्र मार्डी येथील जिल्हा परिषदे च्या प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीपर्यंतचे शिक्षण झाले होते. त्यानंतर सोलापूर येथील गणपती घाटावरील सरस्वती विद्या मंदिरात इयत्ता आठवी ते इयत्ता दहावीचे माध्यमिक शिक्षण झाले असून सोलापूर येथील ए. डी. जोशी विद्यालयातून ज्युनिअर कॉलेज चे शिक्षण झाले आहे.त्यानंतर एल एल बी कायद्याच्या पदवीचे शिक्षण सोलापूर येथील दयानंद कॉलेज मधून केले आहे.

## एन. बी. नवले सिंहगडच्या विद्यार्थिनीची आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**



एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने यंदाच्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यशाची नोंद केली आहे. इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील संजना टाळकोकुलची औद्योगिक ऑटोमेशन क्षेत्रातील जागतिक स्तरावरील 'रॉकवेल ऑटोमेशन' या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये वार्षिक ६.५ लाख रुपयांच्या पॅकेजवर निवड झाली आहे. रॉकवेल ऑटोमेशन ही औद्योगिक ऑटोमेशन आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी मानली जाते.अशा प्रतिष्ठित कंपनीमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची निवड झाल्याने संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण पद्धतीला पुन्हा एकदा दुजोरा मिळाला आहे. दरम्यान, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशातील अग्रगण्य आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) मध्ये संगणक अभियांत्रिकी विभागातील तब्बल नऊ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यापैकी तीन विद्यार्थ्यांची टीसीएसच्या प्रतिष्ठित डिजिटल प्रोफाइलसाठी निवड झाली असून त्यांना वार्षिक ७ लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे. तसेच सहा विद्यार्थ्यांची निंजा प्रोफाइलसाठी निवड होऊन त्यांना वार्षिक ३.३६ लाख रुपयांचे पॅकेज प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, मुलाखत कौशल्ये, सॉफ्ट स्किल्स, संवाद कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत सातत्याने मार्गदर्शन केले जाते. या यशाबद्दल सिंहगड इन्स्टिटयूट, केगाव कॅम्पसचे संचालक संजय नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, इलेक्ट्रिकल विभागप्रमुख रवींद्र बिरादार तसेच सर्व प्राध्यापकांनी संजना टाळकोकुल हिचे अभिनंदन केले.

## रक्तदान, नवे कर्ज धोरण; जि.प. पतसंस्थेच्या सभेत विकासाचा रोडमॅप

### ई-व्हेईकल कर्जधारकांसाठी विशेष प्रस्ताव; सभासदांच्या सूचनांना सकारात्मक प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित क्र. १, सोलापूरची ९२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच फडकुले सभागृहात उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेच्या आर्थिक प्रगतीसह सभासदाभिमुख उपक्रमांवर भर देत भविष्यातील विकासाचा रोडमॅप यावेळी मांडण्यात आला.

सभेपूर्वी सकाळी ११ वाजता संस्थेचे मार्गदर्शक पंडित भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन श्वेतांबरी राऊत होत्या. त्यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेत सभासदांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली.



यावेळी सभासदांनी संस्थेच्या कामकाजाबाबत विविध सूचना मांडल्या. त्याची दखल घेत योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन चेअरमन राऊत यांनी दिले. सभेत उपस्थित सभासदांनी वार्षिक अहवालासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. संचालक मंडळाने त्यांना समर्पक उत्तरे देत सर्व शंकांचे निरसन केले. संस्थेची प्रगती ही सभासदांच्या विश्वासावर उभी आहे. संचालकांनी विश्वस्त भावनेतून काम करून संस्थेला अधिक सक्षम बनवावे, असे मार्गदर्शन पंडित भोसले यांनी केले. चर्चेदरम्यान संस्थेच्या विविध योजनांबाबत सकारात्मक विचारमंथन झाले.

सभेतील विशेष आकर्षण म्हणजे ई-व्हेईकल (ईव्ही) खरेदीसाठी कर्ज घेतलेल्या आणि त्याची ५० टक्के परतफेड केलेल्या सभासदांना एक लाख रुपयांपर्यंत अतिरिक्त कर्ज देण्याचा प्रस्ताव. व्हाईस चेअरमन कलशेट्टी यांनी मांडलेल्या या सूचनेचे सभासदांनी स्वागत केले. यावेळी सेवानिवृत्त सभासदांचा गौरव करण्यात आला. तसेच सभासदांचा लाभांश ऑनलाईन पद्धतीने त्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. रक्तदान शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या छत्रपती शिवाजी रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. रक्तदात्यांना प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले.

याप्रसंगी मार्गदर्शक दयानंद परिचारक, श्रीशैल देशमुख, नित्यानंद शिंदे यांच्यासह संचालक डॉ. एस. पी. माने, विष्णू पाटील, शहाजहान तांबोळी, सुरेश कुंभार, तजमूल मुतवल्ली, शिवाजी राठोड, चेतन वाघमारे, विकास शिंदे, गजानन मारडकर, किरण लालबोन्द्रे, मृणालिनी शिंदे, विजयसिंह घेरडे, रोहित घुले, विशाल घोगरे, शिवानंद म्हमाने, तज्ज्ञ संचालक डॉ. पांडुरंग नवले, स्वीकृत संचालक कुंडलिक खुर्द तसेच कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सभेचे सूत्रसंचालन संचालक विष्णू पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुभाष काळे व विनोद कदम यांनी परिश्रम घेतले.

महत्वाचे...

# गुलाब पाकळ्यांच्या पायघड्या अन् औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत

## शहर, जिल्ह्यात उत्साही वातावरणात रंगला शाळांचा प्रवेशोत्सव

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जून-

दीर्घ सुट्ट्यांनंतर तब्बल दोन महिन्यांनी शाळांची घंटा वाजली असून, शहर आणि जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत अत्यंत उत्साही आणि आनंदमयी वातावरणात करण्यात आले. पहिल्याच दिवशी शाळेत पाऊल ठेवणाऱ्या चिमुरड्यांचे स्वागत करण्यासाठी अनेक शाळांमध्ये चक्क गुलाबाच्या पाकळ्यांच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. ढोल-ताशांचा गजर, फुग्यांची आकर्षक सजावट आणि शिक्षकांचे आपुलकीचे हसरे चेहरे पाहून विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस अतिशय संस्मरणीय ठरला. पारंपरिक आणि निरस पद्धतीला फाटा देत यंदा शाळांनी 'प्रवेशोत्सव' अनोख्या पद्धतीने साजरा केला. जिल्हाभरातील शाळांमध्ये पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.



### पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूल

सोलापूर येथील पी. एस. इंग्लिश मीडियम टेक्निकल हायस्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात व उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारावर रांगोळी, फुग्यांची सजावट व फुलांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नवीन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे औक्षण करून त्यांना वर्गात नेण्यात आले. याप्रसंगी प्राचार्या स्वाती कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नवीन शैक्षणिक वर्ष म्हणजे नवीन स्वप्नांची सुरुवात. मेहनत, शिस्त आणि जिद्दीने प्रत्येक विद्यार्थ्याने यश संपादन करावे. कार्यक्रमास पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, प्री-प्रायमरी समन्वयक अर्चना अक्कलकोटे व प्रायमरी पर्यवेक्षिका रमावत उपस्थित होत्या. संस्थेचे सचिव यतीन शहा, करण शहा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



### कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संस्थेच्या शिक्षण विभाग प्रमुख रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चिक्की, चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप उपस्थित होते. शाळेचा पहिला दिवस म्हणून संपूर्ण शाळा सजवले होते. गेटवर सुंदर रांगोळी, दर्शनी भागात रंगीबेरंगी फुगे लावले होते. सेल्फी पॉईटमधून विद्यार्थी फोटो काढत होते.



### चतुरबाई श्राविका बालमंदिर व विद्यालय

श्री चतुरबाई श्राविका श्राविका प्राथमिक आणि बालमंदिर सम्राट चौक बुधवार पेठ येथे फुलांच्या पाकळ्यांच्या पायघड्यावरून आणि औक्षण करून फुलांच्या वर्षावात विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत करण्यात आले. प्रशालेच्या प्रवेशद्वारावर सुंदर रंगीत फुग्यांच्या कमानीने आणि सुंदर रांगोळीने प्रवेशद्वार सजवण्यात आले होते. याप्रसंगी विशेष आकर्षण ठरले सेल्फी पॉइंट आणि शाळेची प्रतिकृती. इयत्ता चौथी मधील विद्यार्थी थोर शिक्षण सुधारकांच्याच्या वेशभूषेत घोषणा देत प्रबोधन करत प्रवेशद्वारात उभे होते. मोफत पाठ्यपुस्तक वितरण सोहळ्यासाठी पाहुणे म्हणून इयत्ता पहिली मधील शालेय व्यवस्थापन समिती आणि माता पालक संघ यांचे नवीन सभासद सदस्य यांच्या हस्ते पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका राखी देशमाने यांनी केले. याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा ,विद्येची देवता सरस्वती मातेच्या व पाठ्यपुस्तकाच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. पूजनानंतर पाहुण्यांचा परिचय सुजाता काटकर यांनी करून दिले. आभार जयश्री दळवे यांनी मानले. सूत्रसंचालन तृप्ती शहा यांनी केले.




### बोहाळी जि.प. शाळा

पंढरपूर तालुक्यातील बोहाळी जिल्हा परिषद शाळेत शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूर पंचायत समितीचे सभापती डॉ. शुभम आगावणे उपस्थित होते. शाळेच्या वतीने नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प, मुखवटे, बर्थडे टोपी व गोड खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. तसेचविद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसत होता. यावेळी बोहाळीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष वसर्व सदस्य, गावातील बहुसंख्य नागरिक तसेच महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समाज विकासाचा पाया असून प्रत्येक बालकाने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे, हा शासनाचा संकल्प आहे. यासंकल्पपूर्तीसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करू या, असे डॉ. आगवणे यांनी यावेळी सांगितले.



### मारुतीनाना कुलकर्णी विद्यालय, माळशिरस

मारुतीनाना कुलकर्णी प्राथमिक विद्यालया मधील सर्व विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी बँड पथक तैनात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांवरती पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या पुस्तकांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात संचालक धनंजय मस्के, नगरसेविका रेश्मा टेळे, मुख्याध्यापक जानकर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका कांता कांबळे, प्रतिक दोशी, माजी मुख्याध्यापक सुरवसे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थांना शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्राथमिक व पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांची संख्या ४८० असून शिक्षण विभागाकडून पुस्तके प्राप्त झाली असून आज पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आले.



### जि.प. लक्ष्मीनगर शाळा, कुसमोड

माळिशरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद लक्ष्मीनगर शाळेत आज पहिल्याच दिवशी इयत्ता पहीलीमधये प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे ढोल-ताशयांचया गजरात, गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सागर मदने, अमोल खुर्द, सागर राऊत, मुख्याध्यापक सुनिल डुरे, साखरे, अंगणवाडी सेवीका सतयभामा मदने, सरगर उपस्थित होते.



### सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूल

उन्हाळी सुट्टीनंतर नवीन शैक्षणिक वर्षाला उत्साहात सुरुवात झाली असून, सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूल मध्ये प्रवेशोत्सवाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समिती विलास कारभारी, मुख्याध्यापिका उमा बागलकोटी, श्री सिद्धेश्वर इंग्लिश मिडीयम हायस्कूलच्या मुख्याध्यापिका प्रीती दुलंगे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत व औक्षण करून ढोल-ताशांच्या गजरात, रांगोळ्या काढून आणि विद्यार्थ्यांवर गुलाब पुष्पांची उधळण करत व खाऊ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.



### व्ही. जी. शिवदारे प्री -प्रायमरी स्कूल

व्हि. जी. शिवदारे प्री- प्रायमरी स्कूलमध्ये शाळेचा पहिला दिवस साजरा करण्यात आला. सुट्टी संपल्यावर शाळेची ओढ मुलांना लागते. विद्यार्थी खूप आनंदी होते. प्री -प्रायमरीचे सर्व विदयार्थी शाळेत आले होते. शाळेत गुलाबाच्या पाकळ्याच्या पायघड्या घातल्या होत्या, पशु पक्षांची प्राण्यांची चित्रे लावली होती. फुगे लावले होते. विद्यार्थ्यांनी सरस्वती देवीच्या प्रतिमेचे पूजन केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबाचे फुल हातात देवून व खाऊ वाटप करून स्वागत केले. संस्थेचे संस्थापक राजशेखर शिवदारे यांनी सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी यांनी आकाशात फुगे सोडून यांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका पूजा बाजपाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. समन्वयिका मानसी झळिककर व पर्यवेक्षिका अश्विनी बिराजदार यांनी मार्गदर्शन केले.



### हिंगुलांबिका प्राथमिक शाळा

साखर पेठ येथील हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत संस्थेचे माजी संचालक प्रभाकर बासुतकर यांच्याकडून शाळेतील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या, पेन व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हरीओम विणकर बाग बहुउद्देशीय संस्थेचे लक्ष्मीकांत दंडी, हिरालाल धुळम, संस्थेचे अध्यक्ष बापू ढगे, सचिव विजय पुकाळे उपस्थित होते. औक्षण व पुष्पृष्टी करून गोड खाऊ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



### पंचशील प्राथमिक व माध्यमिक प्रशाला

पंचशील प्राथमिक व माध्यमिक प्रशाला येथे विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उपस्थितीत संपन्न झाला. पंचशील प्राथमिक व माध्यमिक प्रशालेच्या वतीने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाच्या प्रथम दिनाचे औचित्य साधून औक्षण आरती व पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल नागनाथ रणधीरे हे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉक्टर ज्योती वाघमारे या उपस्थित होत्याखासदारांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष बुद्धवाशी दलितमित्र नागनाथ रणधीरे व देशातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मार्च २०२६ मध्ये पंचशील माध्यमिक प्रशाला येथून उत्तीर्ण झालेल्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला शाळेच्या पहिल्याच दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश देऊन गोड खाऊ देण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक प्रियदर्शन साठे, नगरसेवक अजहर हुंडेकरी, नगरसेवक जहागीरदार, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह अध्यक्ष सायरा शेख, कसाब मुनाफ, समाज कल्याण अधिकारी आश्विनी मोरे, संस्थेचे संचालक महेश रणधीरे, संचालक सिद्धार्थ रणधीरे, योगेश रणधीरे, मुख्याध्यापिका महामाया ठोंबर, मुख्याध्यापक महालिंग एलगोंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब चटे यांनी तर आभार मिलिंद ठोंबरे यांनी मानले.

### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग



वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, सदस्य शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, शंकर केवट्टी, रमेश दुधगी, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे वाद्यांच्या गजरात व मिकी माऊसच्या सानिध्यात गुलाबपुष्प देऊन स्वागत करुन उर्वरित इतर सर्व विद्यार्थ्यांवर वर्गात जाताना पुष्पवृष्टी करण्यात आले. या दिनाचे औचित्य साधून इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शासनाचे मोफत पाठ्यपुस्तके व संस्थेच्या वतीने पाचवी ते बारावी वर्गातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलप्पा कवटगी, प्राध्यापक संतोष शिंदे, सिध्दारुढ हिरेमठ, बसवराज दुधगी, विरेश थळंगे,गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगांव, शिवराज, प्रा. शरणय्या मसुती, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशैट्टी, ग्रंथपाल निलकंठ चनशेट्टी, विनोद दुधगी, सेवक कट्टेप्पा कोळी, सुनिता कुर्ले आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले तर आभार तानाजी जमादार यांनी केले.



### सोजर इंग्लिश स्कूल, बार्शी

सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्यावतीने शाळेत नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे बॅन्डच्या तालासुरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी रंगबिरंगी फुगे आणि फुलांनी शालेय परिसर सजवण्यात आला होता. नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करताना विद्यार्थ्यांना कुंकुम तिलक लावून करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका रिटा नेटके यांचे हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. तसेच नवागतांना गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात केले. सूत्रसंचालन शिक्षक हरिश्चंद्र भोसले यांनी केले.

### संभाजीराव शिंदे विद्यामंदिर

संभाजीराव शिंदे विद्यामंदिर विडी घरकुल येथे शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सदस्या डॉ. राधिका चीलका यांची उपस्थिती लाभली. तसेच प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक सतीश मल्लाव, मार्गदर्शिका तनुजा मारपल्ली, ज्युनिअर कॉलेजचे प्रमुख प्राध्यापक नवनाथ व्हटकर, प्राथमिक विभागाच्या प्रमुख सविता बरबडे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वती तसेच संस्थेचे आधारस्तंभ स्वर्गीय विष्णुपंत तात्यासाहेब कोठे यांच्या प्रतिमांच्या पूजनाने झाली. प्रस्ताविक प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक सतीश मल्लाव यांनी केले. यावेळी इयत्ता दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच एटीएस परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे, मोफत गणवेशाचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन आणि औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले आहे. सूत्रसंचालन करुणा जामदार यांनी केले तर आभार राखी कोंगारी यांनी मानले.



### मेहता प्राथमिक शाळा

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली. शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव आणि शासनातर्फे मोफत पाठ्यपुस्तक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला. विद्येची देवता श्री सरस्वतीला वंदन करून व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारासमोरील रंगीबेरंगी रांगोळी, आकर्षक फुगे, नारळाच्या झावळ्या, गुलाब पाकळ्यांच्या पायघड्या आणि खास सेल्फी पॉईट यामुळे परिसर आनंदमय आणि स्वागतार्ह झाला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका वनिता पाटील, नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी, अक्षय अंदोरे, मुख्याध्यापिका यांची उपस्थिती होती. श्रुती कुलकर्णी यांनी सरस्वती वंदना सादर केली. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. स्वाती गडदे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन शितल जालीमींचे व आभार मयुरी द्रुगकर यांनी मानले.



आपला
जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## चंद्रशेखर विद्यालयामधील सेल्फीपॉईंट ठरले विद्यार्थ्यांसाठी आकर्षण

**माळशिरस, दि. १५ जून-**

श्रीपूर (ता.माळशिरस) येथील आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट शैक्षणिक संकुलातील चंद्रशेखर विद्यालय प्राथमिक शाळेतील नवागत विद्यार्थ्यांसाठी सेल्फीपॉईंट आकर्षण ठरले. मुख्याध्यापक शंकर यादव यांच्या कल्पकतेतून साकारलेल्या सेल्फीपॉईंटमुळे मुले आनंदात होती. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून एनसीसी ऑफिसर व माजी मुख्याध्यापक अशोक गोविंद पंडित उपस्थित होते. त्याचबरोबर शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विजयकुमार चव्हाण, शिक्षण तज्ज्ञ चंद्रकांत साळुंखे, प्रवीण बोराडे, श्रीकांत माने, बाळासाहेब भोसले, असिफ शेख उपस्थित होते. शालेय पोषण आहाराबरोबर सर्वच विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन गणवेश, नवीन पाठयपुस्तके देण्यात आली. सांस्कृतिक प्रमुख विजयकुमार भाग्यवंत यांनी सूत्रसंचालन केले व आरती डोळे यांनी आभार मानले.



### महत्त्वाचे...



## राष्ट्रसंत व विश्वभूषण विद्यालयात नवागतांचे शिक्षणाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वागत

**सोलापूर**

अक्कलकोट रोडवरील, सद्संकल्प शिक्षण समूहाच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा व विश्वभूषण विद्यालयामध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रवेशोत्सव व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सचिन जगताप (शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जिल्हा परिषद सोलापूर) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सद्संकल्प शिक्षण समूहाचे संस्थापक सचिव अण्णासाहेब भालशंकर हे उपस्थित होते. संस्थेचे कोषाध्यक्ष बोधिप्रकाश गायकवाड उपस्थित होते. यावेळी सूरज अंबुरे, गुरु रेवे, अरविंद ताटे (माध्यमिक शिक्षण विभाग, सोलापूर) उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे व मुख्याध्यापिका मंजुश्री भालशंकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी केले. दिनेश भालशंकर यांनी आभार मानले.



## सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सनई चौघड्याच्या सुरात स्वागत सोहळा

**बार्शी :** सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूल, बार्शीच्यावतीने शाळेत नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे सनई चौघड्याच्या तालासुरात पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी रंगबिरंगी फुगे आणि फुलांनी शालेय परिसर सजवण्यात आला होता. नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करताना दीप प्रज्वलित करून, विद्यार्थ्यांना कुंकुमतिलक लावून औक्षण करण्यात आले. यावेळी बार्शी एज्युकेशन सोसायटी बार्शीचे सचिव अनंत कवठाळे, नगरसेवक भारत पवार, पत्रकार उमेश पवार, शाळेचे मुख्याध्यापक तुषार महाजन, बेताळे, चव्हाण यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. तसेच नवागतांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात केले.



## हराळवाडीत विद्यार्थ्यांचे ट्रॅक्टरमध्ये बसवून जल्लोषात स्वागत

मोहोळ : तालुक्यातील हराळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिलीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत ट्रॅक्टरमध्ये बसवून जल्लोषात करण्यात आले. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षांच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव आनंदाने साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांची सुंदर सजवलेल्या ट्रॅक्टरमधून मिरवणूक काढण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेकडून विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पाठ्यपुस्तके,गणवेश लेखनसाहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमास मेजर गणेश बामणे, मेजर सुरज मोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सावित्रीबाई माडकर, उपाध्यक्ष गजानन पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्या सुरेखा धोडमिसे, गीता पवार, गणेश पवार, पूजा माडकर, कविता माने, सामाजिक कार्यकर्ते पै.माऊली हेगडे, रेवणसिद्ध कांबळे, संजय पवार, सोमनाथ माने, ॲड. चेतन केंगार, रामराजे धोडमिसे, दिगंबर झाडगे, आकाश माने उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी केले. आभार शंकर पाटील यांनी मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका कविता फुटाणे, आरती गुरव, संजय ननवरे आदींनी परिश्रम घेतले.

## शाळा क्रमांक २५-१६ मनपा शाळा क्रमांक २५ मध्ये नवागतांचे स्वागत

सोलापूर : शैक्षणिक वर्षाच्य पहिल्याच दिवशी मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २५ येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. महानगरपालिका मुख्य लेखा अधिकारी रत्नराज जवळेकर, प्रशासन अधिकारी मल्हारी माने तसेच प्रभाग क्रमांक १५ च्या नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. पापाशेठ बलदवा यांच्या माध्यमातून शाळेला शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले होते.

# फेटे घालून मिरवणूक, घोड्यावरुन रपेट, कुठे घेतले पायांचे ठसे !



### शाळा प्रवेशोत्सवानिमित्त जिल्ह्यातील शाळांमध्ये विविध अभिनव उपक्रम

### विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह; पालकांचीही मने झाली प्रफुल्लित!



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**

सोमवारी दि. १५ जून रोजी जिल्ह्यातील सर्वच शाळांमध्ये शैक्षणिक वर्षांच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव अलोट उत्साहात पार पडला. कुठे नवागतांची फेटे बांधून ट्रॅक्टर, बैलगाडीतून मिरवणुक, कुठे घोड्यावरुन रपेट, नवागतांचे पायाचे कुंकवात बुडवून घेतलेले ठसे असे विविध अभिनव उपक्रम राबवण्यात आले. याबरोबरच पहिल्याच दिवशी मुलांना नवीन गणवेश, शालेय साहित्य वाटप करण्यात आले. काही ठिकाणी त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन त्यांना सामाजिक जाणीवांचाही बोध करुन देण्यात आला. सर्वच उपक्रमांनी मुलांचे चेहरे कमालीचे आनंदित झाल्याचे दिसत होते. आपल्या पाल्यांच्या झालेल्या इतक्या छान स्वागताने पालकांच्या चेहऱ्यावरही विलक्षण आनंद दिसून येत होता.



## मार्डी जि.प. शाळेत शालेय साहित्य देवून विद्यार्थ्यांचे स्वागत

### मुलांच्या हस्ते वृक्षारोपण करुन दिली सामाजिक जबाबदारीची जाणीव

**सोलापूर :** नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी प्राथमिक शाळा, मार्डी येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्वही पटवून देण्यात आले.

जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, मार्डीच्या सरपंच प्रांजली पवार, ग्रामपंचायत सदस्य सरोजनी जगताप, बाळासाहेब पाटील, युवराज पवार, गणेश पवार, कमलाकर माने, संजय इनामदार, नामदेव गवळी, रवी मठे, कादिर कुडले, अझर शेख आदींच्या उपस्थितीत म ुलांचे स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वह्या, पाठ्यपुस्तके आणि शालेय गणवेशांचे वितरण करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी प्रवेशोत्सव

शिक्षणाचा आनंद, संस्कारांची जोड आणि पर्यावरणाची ओढ या संकल्पनेला साजेसा हा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

**इंद्रजीत पवार,** उपाध्यक्ष,
जिल्हा परिषद, सोलापूर.



## कुसमोडमध्ये नवागत विद्यार्थ्यांची घोड्यावर रपेट ; खाऊचे वाटप

पिलीव : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पवारवस्ती येथे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना घोड्यावरून रपेट मारून थाटामाटात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह ओसंडून वाहत होता.

प्रवेशात्सव सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरस पंचायत समितीचे सभापती पै दत्ता मगर, उपसभापती मनिषा मदने उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनीही प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून विविध महापुरुषांच्या वेशभूषा परिधान केलेल्या होत्या. शाळेत झालेल्या अश्व आगमनाने वातावरण प्रफुल्लित झाले होते. शाळेतील सर्व मुला मुलींनी हलगीच्या निनादात घोड्यावरून फिरण्याचा मनसोक्त आनंद लुटला. यावेळी पंचायत समिती माळशिरसचे बालाजी लेकुरवाळे, अध्यक्ष तेजस पवार, उपाध्यक्ष सुशील महामुनी, शेखर कपने, अमर लवटे, दादा पवार, उम ाजी बोडरे , बाळकृष्ण बोडरे, प्रशांत लोखंडे, सचिन जाधव, भिम कपने, विकास महानवर, ज्ञानेश्वर मदने, रवी लोखंडे, माता पालक, अंगणवाडीतील शिक्षिका लवटे व धायगुडे उपस्थित होत्या. गोड शिरा भात, फ ुगे व वाढदिवसाच्या टोप्या देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सूत्रसंचालन सचिन गाटे यांनी केले. आभार रेखा गाटे यांनी मानले. उपक्रमाबद्दल माळशिरस तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांनी पवार वस्ती शाळेचे अभिनंदन केले.



## पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पंढरपूर

**पंढरपूर :** पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शाळेच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

स्वागत समारंभासाठी संस्थेचे सचिव सुधीर पटवर्धन तसेच संस्थेचे अध्यक्ष नाना कवठेकर, संस्थेचे सदस्य डॉ.मिलिंद जोशी, एस.पी. कुलकर्णी, संजय कुलकर्णी व प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुनीता म ोहोळकर यांच्यासह सर्व शिक्षक तसेच पालक उपस्थित होते. मान्यवरांनी नवीन वर्षासाठी सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. शाळेच्या आज पहिल्याच दिवशी जवळजवळ ३६५ विद्यार्थी हजर होते. काही बालचमुंनी तर रडूनच पहिला दिवस साजरा केला. डोरेमोनच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांनी नवीन बालचमुंचे स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवीन वर्षाचा आनंद काही आगळा वेगळाच होता.

प्री- प्रायमरी सेक्शनच्या सर्व विद्यार्थ्यांना आज औक्षण करून खाऊचे वाटप करण्यात आले. अशाप्रकारे प्रशालेचा नवीन वर्षाचा पहिला दिवस खूप आनंदात पार पडला. यासाठी प्रशालेच्या सर्व शिक्षकांनी खूप परिश्रम घेतले. प्रशालेच्या काळे, जगताप, जाधव, पोरे, शिंदे, दुरुगकर, चोबे, हुच्चे, क्षितिज मोहोळकर, पृथ्वीराज पाटील उपस्थित होते.

## माढा जिल्हा परिषद मुलींची केंद्र शाळेत विद्यार्थीनींचे औक्षण



माढा : जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची केंद्र शाळा माढा येथे नवीन शैक्षणिक वर्षात शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. आमदार अभिजीत पाटील, गट शिक्षणाधिकारी विकास यादव, माढा नगरपंचायत नगराध्यक्षा ॲड.मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगरसेवक अजिनाथ राऊत, नाना साठे, नगरसेविका वंदना लंकेश्वर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश मोरे, उपाध्यक्षा वर्षा गायकवाड उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सावित्रीम ाई फुले यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुरेश माळी यांनी केले. मान्यवरांचा सत्कार शाळेकडून केला. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थिनींचे स्वागत औक्षण करून व त्यांच्या पहिल्या पावलाचा ठसा घेऊन करण्यात आले. त्यांच्यावर पुष्प वर्षाव करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पहिलीच्या विद्यार्थिनींना पुस्तक व गणवेश वाटप केले. शाळेतील सर्व विद्यार्थिनींना पुस्तक व गणवेश वाटप केले. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थिनींची मिरवणुक काढण्यात आली. नगरसेविका वंदना लंकेश्वर यांच्याकडून सर्व विद्यार्थिनींना जिलेबी वाटप केली. सुरेश साठे व संदीप साठे यांनी विद्यार्थिनींना इंग्रजी उजळणी भेट दिली. सूत्रसंचालन विनोद परिचारक व आभार घावटे मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक सुरेश माळी, प्रशांत होवाळ, चारुदत्त अष्टेकर, कानडे, उबाळे, घावटे, लोखंडे यांनी परिश्रम घेतले.



## संत ज्ञानेश्वर विद्यालय भातंबरे येथे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत

**वैराग :** येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात आज दि. १५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाचा 'प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात तांबेवाडी येथे जाऊन करण्यात आली. शाळेच्या वतीने शिक्षक आणि ग्रामस्थांनी तांबेवाडीतील नवोदित विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले व त्यांना वाजतगाजत शाळेत आणले.

शाळेत मुख्य कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि शिक्षणमहर्षी डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या अर्धपुतळ्याचे पूजन करून करण्यात आली. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले विद्यालयाचे माजी विद्यार्थी अविनाश वाघमोडे यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. तसेच त्यांची संत ज्ञानेश्वर विद्यालय माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

# बार्शीत शाळांची पहिली घंटा उत्साहात वाजली

**बार्शी :**

उन्हाळी सुट्टीनंतर सोमवार, दि. १५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात झाली. बार्शी शहर व तालुक्यातील शाळांमध्ये पहिल्या दिवशी उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करून, गुलाब पुष्प देण्यात आले. बँड पथकांच्या नादात, ढोल-ताशांच्या गजरात आणि काही ठिकाणी बग्गीतून मिरवणूक काढत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून अनेक शाळांनी आकर्षक प्रवेशोत्सवाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्सुकता आणि नव्या शैक्षणिक वर्षाविषयीचा उत्साह पाहण्यासारखा होता. बार्शीतील नवीन मराठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांची बग्गीतून मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

यंदा दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखणाऱ्या सिल्व्हर जुबिली

### ढोल-ताशे, बँड पथक, औक्षण आणि गुलाब पुष्पांनी विद्यार्थ्यांचे स्वागत




हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे बँड पथकाच्या साथीने उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचा आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. शहरातील महाराष्ट्र विद्यालय, सुलाखे हायस्कूल, शेठ अगरचंद कुंकूलोळ प्रशाला, बार्शी टेक्निकल हायस्कूल, महात्मा फुले शाळा, अभिनव विद्यालय, कन्या प्रशाला, मॉडेल हायस्कूल, साधना कन्या प्रशाला, प्राथमिक विद्यामंदिर, जनसेवा हायस्कूल तसेच बार्शी नगरपरिषदेच्या २० शाळा आणि खाजगी २७ शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर तालुक्यातील ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या व खाजगी शाळांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

एकंदरीतच बार्शी शहरा व तालुक्यात शाळेच्या पहिल्या दिवशी आनंद, उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण पहायला मिळाले. ढोल-ताशांच्या तालावर, बँड पथकांच्या नादात, औक्षण करत आणि गुलाबपुष्प देत विद्यार्थ्यांचे स्वागत करुन नव्या शैक्षणिक वर्षाची संस्मरणीय सुरुवात करण्यात आली.

### ७० टक्केच पाठ्यपुस्तके उपलब्ध; अनेक विद्यार्थी वंचित

प्राप्त विद्यार्थी संख्येच्या तुलनेत सुमारे ७० टक्केच पाठ्यपुस्तके उपलब्ध झाल्याने सर्व विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पुस्तके वितरित करता आली नसल्याची माहिती पंचायत समिती शिक्षण विभागाच्यावतीने देण्यात आली.